**अरक चिंचाळा बृहत ल.पा. योजना ता.मंगरुळपीर,जि.वाशिम या योजनेस प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.**

## विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,नागपूर.

**महामंडळाचा निर्णय क्र.:**१२९/विपाविम/कातां.७(१)/(धा.क्र.०६/२०१९)/२०२३/ अरक चिंचाळा सुप्रमा/२०२३, दिनांक:- १८/०७/२०२३

**संदर्भ:** १. मुळ प्रशासकीय मान्यतेचा विपाविम,नागपुर चा निर्णय क्र.विपाविम /कातां७ /६५/ अरकचिंचाळा / प्रमा / (११५/२००९)/२००९, दि.२७/०२/२००९.

२. शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१५/(३५/२०१५)/जसं(आ), दि. ०९.०९.२०१५.

३. अधीक्षक अभियंता, रातांसस, नाशिक यांचे पत्र. क्र. रातांसस(१)/ अरक चिंचाळा /(धा.क्र.७४/२०२२) /१९७/२०२३, दि. २७.०२.२०२३

४. अतिरीक्त मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, यांचे अध्यक्षतेखाली दि.२.६.२०२३ रोजी झालेल्या सचिव स्तरावरील उपसमितीच्या बैठकीचे इतिवृत्त क्र. बैठक-२०२३/(३७/२०२३)/ लपा, दि. १३.६.२०२३

५. विपाविम नियामक मंडळाचे दि. १९.६.२०२३ रोजी संपन्न ८३ व्या बैठकीतील मंजुर ठराव क्र. ८३/३०

**प्रस्तावना:**

अरकचिंचाळा बृहत लघु पाटबंधारे योजना, हा प्रकल्प या महामंडळांतर्गत वाशिम जिल्ह्यातील मंगरुळपीर तालुक्यातील अरक गावाजवळून वाहणा-या मडान नदीवर बांधण्यात येत आहे. सदर प्रकल्पामुळे वाशिम जिल्ह्यातील ,मंगरुळपीर तालुक्यातील ६ गावातील ८१५ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे.

अरकचिंचाळा बृहत लघु पाटबंधारे योजना, ता. मंगरुळपीर, जि. वाशिम या योजनेस विपाविम निर्णय क्र. विपाविम /कातां ७ /६५ /अरकचिंचाळा /प्रमा/ (११५/२००९) /२००९,दि.२७/०२/२००९ अन्वये रू.१४.३१कोटी (रू.चौदा कोटी,एकतीस लक्ष फक्त) इतक्या किंमतीस (दरसुची २००८-०९ वर आधारीत) मुळ प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली .

बांधकामाचे दरम्यान योजनेच्या खर्चात दरसुचीतील बदलामुळे झालेली वाढ, भुसंपादन किंमतीतील वाढ, संकल्प चित्रातील बदल इत्यादी प्रमुख कारणांमुळे वाढ झाली असून योजनेची अद्यावत किंमत मुळ प्रशासकीय मान्यता किंमतीच्या दहा टक्क्याहून अधिक वाढत असल्याने प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करणे आवश्यक झाले आहे.

अरकचिंचाळा बृहत लघु पाटबंधारे योजना,ता. मंगरुळपीर,जि. वाशिम योजनेचा प्रथम सुप्रमा बाबतचा छाननी अहवाल राज्यस्तरीय तांत्रीक सल्लागार समिती (१), नाशिक, यांचे दि. २८.१२.२०२२ रोजीच्या १८२ व्या बैठकीत अंतिम करण्यात आला असून पुढील कार्यवाहीस्तव संदर्भिय पत्र क्र. ३ नुसार प्राप्त झालेला आहे.

अरकचिंचाळा बृहत लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या प्रथम सुप्रमा प्रस्तावावर दि.२.६.२०२३ रोजी झालेल्या मा.सचिव उपसमितीचे बैठकीत चर्चा होवून प्रस्ताव नियामक मंडळासमोर पुढील निर्णयार्थ सादर करण्यास सहमती दर्शविण्यात आली आहे.

संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयानुसार विदर्भातील प्रकल्पांना सु.प्र.मा. देण्याचे अधिकार महामंडळास प्रदान करण्यात आलेले आहेत.

दि. १९.६.२०२३ रोजी संपन्न नियामक मंडळाचे ८३ व्या बैठकीतील ठराव क्र. ८३/३० नुसार अरकचिंचाळा बृहत लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या रू. ३६४.९१ कोटी अंदाजित किंमतीच्या प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावास राज्य तांत्रिक सल्लागार समिती यांनी केलेली छाननी व सचिव स्तरावरील उपसमितीच्या दि.०२.०६.२०२३ च्या बैठकीमध्ये झालेल्या शिफारशीचे अधीन राहुन अरकचिंचाळा बृहत लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या प्रथम सुप्रमा प्रस्तावास व प्रकल्पाच्या प्रथम सुप्रमा मंजुरीचे आदेश कार्यकारी संचालक यांनी निर्गमित करणेकरीता नियामक मंडळाने मान्यता प्रदान केलेली आहे.

सदर प्रकल्पाची **मुळ** प्रशासकीय मान्यता किंमत रू. १४.३१कोटी च्या तुलनेत प्रथम सुप्रमा प्रस्तावानुसार प्रकल्पाची किंमत रू. ३५०.६० कोटीने जास्त आहे. किंमत वाढीची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेत:-

| **अ.क्र.** | **बाब** | **वाढ रू कोटी** | **मंजूर प्रमा किंमतीच्या तुलनेत वाढीची टक्केवारी** | **एकूण वाढीच्या तुलनेत वाढीची टक्केवारी** |
|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** |
| १ | दरसुचीतील बदलामुळे झालेली वाढ | २४.११ | १६८.४८ | ६.८८ |
| २ | जादा दराची निविदा स्विकारल्यामुळे झालेली वाढ | ०.६३ | ४.४० | ०.१८ |
| ३ | भूसंपादनाच्या किंमतीतील वाढ | २४५.७१ | १७१७.०५ | ७०.०८ |
| ४ | अपुरे सर्वेक्षण | ५३.४१ | ३७३.२४ | १५.२३ |
| ५ | इतर कारणांमुळे झालेली वाढ | १७.०१ | ११८.८७ | ४.८५ |
| ६ | अनुषंगीक खर्च वाढ | ९.७३ | ६७.९९ | २.७८ |
| **एकूण** | | **३५०.६०** | **२४५०.०३** | **१००** |

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचा निर्णय:-**

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ आता या निर्णयान्वये वाशिम जिल्ह्यातील अरकचिंचाळा बृहत लघु पाटबंधारे योजना, ता. मंगरुळपीर, जि. वाशिम या योजनेच्या एकूण अंदाजित खर्च रू. ३६४.९१ कोटी (रू.तीनशे चौसष्ट कोटी, एक्यानऊ लक्ष फक्त) किंमतीस प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करीत आहे. त्यापैकी रू. ३५४.१३कोटी (रू.तीनशे चौपन्न कोटी तेरा लक्ष फक्त) कामा प्रित्यर्थ व रू. १०.७८कोटी (रू. दहा कोटी अठयात्तर लक्ष फक्त) अनुषंगिक खर्च आहे. अंदाजपत्रकात उर्वरीत कामांसाठी जलसंपदा विभागाच्या व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०२२-२३ या वर्षाच्या दरसूचीप्रमाणे दर